Pune Police

प्रेस नोट

दिनांक :-०१/०८/२०१७

पुणे पोलीस आयुक्तालयातील वाहन चोरीचे गुन्हयांमध्ये जप्त करण्यात आलेली वाहने गुन्हयांचा निकाल लागेपर्यंत पो.स्टे. येथे पडून राहू न राहता फिर्यादींना त्वरीत मिळावीत या **पुणे शहर, पोलीस आयुक्त श्रीमती रश्मि शुक्ला** यांचे संकल्पनेतून त्यांचे हस्ते वाहन चोरीचे गुन्हयातील जप्त वाहने नमुद गुन्हयातील फिर्यादींना परत देण्याचा कार्यक्रम वेळोवेळी आयोजित करण्यात आलेला होता.

सदर कार्यक्रमाअंतर्गत सन-२०१६ मध्ये, पुणे पोलीस आयुक्तालयातील पो.स्टे. अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या वाहन चोरीचे गुन्हयांत जप्त करण्यात आलेली एकुण १४७० वाहनांपैकी एकुण १२७८ वाहने फिर्यादीना परत करण्यात आलेली आहेत. तसेच सन-२०१७ जुन अखेर वाहन चोरीचे गुन्हयांत जप्त करण्यात आलेल्या एकुण ७३१ वाहनापैकी ५५५ जप्त वाहने फिर्यादींना परत करण्यात आली आहेत.

वरील प्रमाणे सन-२०१६ मध्ये जप्त केलेल्या वाहनांपैकी ८७ टक्के वाहने तसेच सन-२०१७ जुन अखेर जप्त केलेल्या वाहनांपैकी ७६ टक्के वाहन फिर्यादींना परत करण्यात आलेली आहेत. उर्वरीत जप्त वाहने नमुद गुन्हयातील फिर्यादींना परत करण्याची कार्यवाही चालू राहणार आहे.

---oo--